# जागतिकीकरण आणि भारत




संपादक

डॉ. मारोती तेगमपुरे

डॉ. कल्याण गडकर

प्रा. राजक्रांती वलसे

डॉ. संतोष रणखांब

Lala Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# जागतिकीकरण आणि भारत

: संपादक :

**डॉ. मारोती तेगमपुरे**
गोदावरी महाविद्यालय, अंबड,
जि. जालना

**डॉ. कल्याण गडकर**
तेरणा महाविद्यालय,
उस्मानाबाद

**प्रा. राजक्रांती वलसे**
श्री.बद्रिनारायण बारवाले
महाविद्यालय, जालना

**डॉ. संतोष रणखांब**
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी

**प्रकाशक**
**चिन्मय प्रकाशन,**
सवणेकर बिल्डिंग,
जिजामाता कॉलनी, पैठण गेट,
औरंगाबाद. मो. ९८२२८७५२१९
chinmayprakashan@gmail.com

**अक्षरजुळवणी**
केदार भोगले
आशीर्वाद टाईपसेट्र्स, अंबड
वेदिका टाईपसेट्र्स, औरंगाबाद.

© लेखकाधीन

२६ जानेवारी २०१७

**मुद्रक**
प्रिंटो ग्राफिक्स
औरंगाबाद.

**मुखपृष्ठ**
अपूर्वा ग्राफिक्स, औरंगाबाद.

₹ : २२५/-

ISBN NO - 978 - 93 -84593 - 79 - 7

Sonpeth
Pin-431516

२०

# ग्रामीण राजकारणाची दशा व दिशा

प्रा.डॉ. ओंभळे बी. व्ही.

प्रसिध्द पाश्चिमात्य प्राचीन राजकिय विचारवंत ॲरिस्टॉटलने म्हटल्याप्रमाणे, "मनुष्य हा राजकिय प्राणी आहे." हा मानावाचा स्थायीभाव असला तरी मानवाचे राजकारण सतत बदलत गेले आहे. परिस्थितीत परिवर्तन झाले की, मानवाचे सर्व संदर्भ बदलतात. याला राजकारण सुध्दा अपवाद नाही. राजकारण प्राचीन होते, आर्वाचीन होते, आधुनिक होते आणि नव आधुनिक सुध्दा आहे. कालानुसार राजकारणाची व्याप्ती, स्वरुप व महत्व बदलत गेले आहे. एक काळ होता राजकारण राज महालात होते. औद्योगिकीकरणाच्या काळात ते यंत्राच्या चाकावरोबर पट्ट्यावरुन धावू लागले. आज ते इंटरनेट, फेसबूक, टी.व्ही. च्या डिजिटल चेहऱ्याने चमकत आहे. राजकारणाची ही गतिशीलता न थांबणारी आहे.

एक काळ होता राजकारण व धर्मकारण यांच्यात सत्तासंघर्ष होता. राजकारण श्रेष्ठ का धर्मकारण? हा वाद सर्वश्रुत आहे. मध्ययुगीन काळात धर्मकारणाने राजकारणावर मात केली तर एक काळ राजकारण व समाजकारण यांतील संघर्ष पहावयास मिळतो. राजकीय सुधारणा अगोदर का समाजिक सुधारणा अगोदर? हा वादही तितकाच सनातन आहे असे म्हणता येईल. राजकारणात अर्थ कारणास अर्थ प्राप्त झाला आहे. अर्थ प्राप्तीसाठी राजकारण हे सूत्र निर्माण झाले आहे. अर्थकारण आणि राजकारण यांचा घनिष्ट संबंध निर्माण होण्यास काय कारण आहे. असा प्रश्न जर कोणी केला तर त्याचे सरळ व सोपे उत्तर म्हणजे जागतिकीकरण हे आहे.

इ.स. १९८५-८६ पासून आजपर्यंत जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण हे शब्द ऐकत आहोत आता जगात सर्वच जागतिकीकरणाचे वारे वाहणार, जग जवळ येणार, जगाला ग्लोबल व्हिलेज चे स्वरुप येणार, या सर्व बाबींचा प्रचारकी भडीमार सर्वत्र सुरु आहे.

Late Ramesh Warpudkar ACS
Sonpeth

## भारत व जागतिकीकरण :

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने मिश्र अर्थव्यवस्था स्विकारली. देशातील अवजड उद्योगधंदे सार्वजनिक मालकाचे तर लघुउद्योग खाजगी मालकाचे या सर्व व्यवहारात सरकारचे नियंत्रण असेल अशी ही व्यवस्था होती. या धोरणामुळे भारताने काही क्षेत्रात प्रगती केली तर काही क्षेत्रात देशाला म्हणावा तसा विकास करता आला नाही. दारिद्रय, बेकारी, महागाई या समस्यांनी उग्र स्वरुप धारण केले. सार्वजनिक क्षेत्रातील मोठमोठे उद्योगधंदे तोट्यात गेले. यामुळे देशाच्या तिजोरीतून परकीय चलन गंगाजळीत येणे मोठ्याप्रमाणात घटले. १९९० च्या दशकात तर भारताकडे आठ दिवस पुरेल एवढाच चलनसाठा होता. याच वेळी जगात जागतिकीकरणाचे वारे जोराने वाहू लागले. जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या आर्थिक संस्थांची यात महत्वाची भूमिका होती. सन १९९१ च्या आर्थिक संकटातून सावरण्यासाठी भारत सरकारने उपरोक्त दोन्ही जागतिक संस्थांकडे कर्ज मागितले तेव्हा या दोन्ही वित्तसंस्थानी भारत सरकाला काही अटीच्या अधीन राहून कर्ज देण्याचे मान्य केले. त्या अटी या होत्या, परकीय व्यापार मुक्त करणे, रुपयाचे अवमूल्यन करणे, परकीय भांडवलासाठी भारतीय बाजारपेठ खुली करणे, अनुदानात कपात करणे व आयात निर्यात कर कपात करणे इत्यादी.

भारताची तत्कालीन आर्थिक परिस्थिती पाहून भारत सरकारने या अटी स्वीकारण्याचे मान्य केले, पुढे ३१ डिसेंबर १९९५ रोजी भारताने जागतिक व्यापार करारावर सही केली. तेंव्हापासून भारताने जागतिक मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण स्वीकारले यालाच दुसऱ्या भाषेत जागतिकीकरण असे म्हणता येईल. सर्वसाधारणपणे जागतिकीकरण ही एक आर्थिक प्रक्रिया आहे. जागतिकीकरणा संबंधी जागतिक बँक म्हणते, 'उपभोग्य वस्तूसह सर्व वस्तुंच्या आयातीवरिल नियंत्रण समाप्त करणे, आयात शुल्काचे दर कमी करणे आणि सार्वजनिक उद्योगधंद्याचे खाजगीकरण करणे या एकूण प्रक्रियेला जागतिकीकरण म्हणता येईल.' थोडक्यात उदारीकरण, खाजगीकरण या प्रक्रियेचा अंतर्भातव जागतिकीरणाच्या प्रक्रियेत होतो. जागतिकीकरणामध्ये आपल्या देशाची अर्थव्यवस्था जगाच्या अर्थव्यवस्थेशी जोडली जाते. यात वस्तू, सेवा, भांडवल, श्रम व तंत्रज्ञान इत्यादींचा देशाच्या सीमेबाहेर मुक्त संचार करणे व आपली अर्थव्यवस्था दुसऱ्या देशाला त्याचकरिता खुली करणे म्हणजे जागतिकीकरण होय.

### जागतिकीकरणाचे ग्रामीण राजकारणावर झालेले परिणाम

जागतिकीकरणाची प्रक्रिया प्रामुख्याने आर्थिक घटकांशी संबंधीत असली तरी तिचे परिणाम इतर क्षेत्रावरही झाले आहेत. याला भारतातील ग्रामीण राजकारणही अपवाद नाही. खेडी हा भारताच्या राजकीय सामाजिक व्यवस्थेचा कणा आहे. यासाठीच

महात्मा गांधी सारख्या राजकीय विचारवंताने 'खेड्याकडे चला' असा नारा दिला होता. भारताची खेडी जर स्वयंपूर्ण झाली तर भारत स्वयंपूर्ण होईल. म्हणून भारताच्या ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. यासाठी आज पर्यंत शासनाने प्रयत्न केले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळापासून ग्रामीण राजकारणाचा विकास करण्यासाठी भारतीय राज्यघटनेने ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यांचा समावेश होतो. १९९३ च्या ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीने स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक अधिकार दिले. यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन समाजातील विविध घटकांना सत्तेत वाटा मिळाला. स्त्रीयांना ५० टक्के आरक्षण देण्यात आले. यामुळे स्त्रीयांचा राजकीय सहभाग मोठ्या प्रमाणात वाढला. दुसरे म्हणजे जागतिकीकरणाच्या रेट्याने एका पातळीवर नवे राजकारण सुरु झाले आहे. याला शहरी हितसंबंधाचे राजकारण म्हणता येईल, तसेच राजकारण आणि अर्थकारण यांच्यातील अंतर कादून अर्थकारण नियंत्रीत राजकारण पुढे आले. जागतिकीकरणामुळे बांधकाम व्यवसाय, हॉटेल व्यवसाय (ढाबा संस्कृती) जमिनीचे व्यवहार आणि विशेष आर्थिक क्षेत्रांची वृध्दी या बाबतची धोरणे ग्रामीण जन-जीवन प्रभावित करताना दिसतात. सर्व आर्थिक व्यवहार लोकहिताची पर्वा न करता राजकरणाचे नवनवीन आधार आकारला येत आहेत. विचारप्रणाली, लोकाभिमुख धोरणे, कार्यक्षम राज्यकारभार यांच्यापेक्षा भावनिक आवाहन, समुहभानाचे राजकारण या नव्या राजकारणाला सुरुवात झाली आहे. जागतिकीकरणामुळे प्रतिकात्मक राजकारण वाढत आहे. विकासाचे पायाभूत प्रश्न बाजुला पडले आहेत. निवडणुका आल्या की, प्रतीकात्मक राजकीय विषय प्रचाराचे मुद्दे म्हणून पूढे येतात. राजकारण व्यवस्था परिवर्तनाचे व समाज परिवर्तनाचे साधन आहे, पण जागतिकीकरणाने राजकारणाला व्यावसायिक (धंदेवाईक) स्वरुप दिले आहे. यामुळे भ्रष्टाचार व राजकारण यांचा परस्पर संबंध वाढला आहे. राजकारणासाठी भ्रष्टाचार करुन पैसा कमावणे आणि राजकारणात एखादे पद मिळाले की, पुन्हा त्यामाध्यमातून भ्रष्टाचार करणे हे दुष्टचक्र निर्माण झाले आहे. आणि हे केवळ लोकसभा, विधानसभा या वरिष्ठ राजकारणात आहे असे नाही तर जिल्हा परिषद, पंचायत समित्या व ग्रामपंचायत पर्यंत निर्माण झाले आहे. सात सदस्यीय ग्रामपंचायतीचा सरपंच जरी व्हायचे म्हटले तरी आज दहा एक लाख रुपये खर्च करावा लागतो आहे. एवढेच नाही तर ग्रामीण भागात बोली लावून सरपंच, उपसरपंच ही पदे पैशाने विकत घेतली जात आहेत. शासनाच्या बहुतांश योजना आज लोकसहभागातून राबविण्यावर भर दिला जात आहे. परंतु प्रत्यक्षात कोणत्याही गावातील सर्वसामान्य माणूस रितसर

वर्गणी भरत नाही, तर योजना प्रत्यक्ष राबविणारा टेंडरधारक आपल्या खिशातून वर्गणी भरतो आणि मग ती वर्गणी व आपला उर्वरित नफा एकूण योजनांतून तो कमावितो. ग्रामपंचायतीपासून ते लोकसभेपर्यंतच्या सर्व निवडणुकांमध्ये काळ्या पैशाचा वापर फार वाढला आहे. खेड्यापाड्याच्या निवडणुकांमध्ये मतदाराला आकर्षित करण्यासाठी तीर्थस्थळांच्या यात्रा घडवल्या जातात. लावणी व तमाशाची मेजवानी फुकट चाखायला मिळते. गावच्या ढाब्यावर जेवनावळी तर नित्याची बाब झाली आहे. निवडणुकदरम्यान किशोरवयीन मुलांना दारु, गुटखा, बीअर, थम्सअप, पेप्सी फुकट देवून त्यांना व्यसनाधीन बनविण्याचे कार्य आज ग्रामीण राजकारणात मोठ्याप्रमाणात होत आहे.

नव्या आर्थिक धोरणामुळे विषमता मोठ्याप्रमाणात निर्माण झाली आहे. शहरीकरण मोठ्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे झोपडपट्यांचा प्रश्न शहरातून उग्र बनला आहे. तर ग्रामीण भागातील अपुऱ्या सुविधांमुळे तरुण वर्ग मोठ्याप्रमाणात स्थलांतरीत होत आहे. यामुळे राहण्याचे, खाण्याचे, पाण्याचे असे सर्वच प्रश्न दोन्ही स्तरावर भेडसावत आहेत. आज ग्रामीण भागात आठरा तास लोडशेडिंग आहे. याचा परिणाम शेती उत्पादनावर झाला आहे. गेल्या दीड - दोन शतकात भारताच्या ग्रामीण भागात आरोग्य, शिक्षण, रेशन, वीज, पिण्याचे पाणी, रस्ते यांच्या समस्या मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. जगातील सर्वात जास्त श्रीमंत लोक आपल्याच देशात आहेत. तर जागतिक भूक निर्देशांकानुसार बालक कुपोषणाचे प्रमाण आपल्याच देशात जास्त आहे. २०१२ च्या दुष्काळाचा सर्वात जास्त फटका ग्रामीण भागातील लोकांना बसला आहे. दुष्काळ निवारणाच्या सर्व योजना जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य सरपंच यांनी घेतल्या आहेत. शेततळे, सिंचन विहिरी, कुपनलिका, शेतीसाठीचे अवजारे, अनुदानावर मिळणारे बी-बियाणे, खते व रासायनिक औषधे ही सर्व साहित्य सामान्य माणसाला भेटत नाहीत, तर गावातील मध्यम वर्ग यात मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार करीत आहे. गावातील धनदांडगे लोक शासनाच्या सर्व अनुदानीत योजनांचा फायदा घेतात. ज्यांना खरी गरज आहे अशा गरजवंतांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळत नाही.

जागतिकीकरणामुळे गावचे गावपण नष्ट झाले आहे. ग्लोबल व्हिलेजमुळे जग जवळ आले आहे, असे आपण एकीकडे म्हणत असलो तरी गावच्या राजकरणामुळे गावा-गावात जातीच्या, धर्माच्या, आडनावाच्या आणि घराण्याच्या नावाने गट तट निर्माण झालेले पहावयास मिळत आहेत. गाव तिथे बारा भानगडी या म्हणीचा प्रत्येय जागोजाग येत आहे. माणूस माणसापासून दुर गेला आहे. गावाच्या कोणत्याही सार्वजनिक कार्यात राजकारण आडवे येत आहे. एखाद्या गावातील नेतृत्व गावच्या विकासासाठी काही योजना राबवीत असेल तर ती योजना मोडीत कशी काढता येईल यासाठी विरोधासाठी विरोध

केला जात आहे. आदर्श गाव योजना, तंटामुक्ती योजना, यशवंत ग्राम सुधार योजना, घरकूल योजना, निर्मल ग्राम सुधार योजना, जलस्वराज्य योजना, दलित वस्ती सुधार योजना या सर्व योजना ग्रामीण भ्रष्टाचाराचे कुरण झालेल्या आहेत.

आज टी.व्ही., इंटरनेट, मोबाईल, मोटार सायकल, ट्रॅक्टर, ॲटो ही सर्व साधने खेड्यात उपलब्ध झाली आहेत. भांडवलशाहीच्या विकासाचा बागुलबुवा (डोलारा) उभार करणाऱ्या या वस्तू सर्व सामान्यांना भूरळ घालत आहेत. त्यामुळे या वस्तूच्या विक्रीतून बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणात शोषण करीत आहेत. इलेक्ट्रॉनिक मिडियाच्या प्रसारामुळे ग्रामीण राजकारण अधिक प्रभावित झाले आहे. मोबाईल संस्कृतीचा फास खेड्याभोवती आवळला जात आहे. पक्के घर, स्नानगृह, शौचालय नाही पण मोबाईल पाहिजे. चित्रपट सृष्टितील नायक नायिकांचे नाटक चाळे पाहून चंदेरी स्वप्न रंगवण्यात खेड्यातील तरुणवर्ग आघाडीवर आहे. यामुळे खेड्याचे पाच 'भ' पुर्णतः बदलले आहेत. भाषा, भोजन, भवन, भजन, भुषण इ. यांचे पुर्णतः जागतिकीकरण झाले आहे. यामुळे सांस्कृतिक परिवर्तन झपाट्याने झाले आहे.

**समारोप :**

१९७२ च्या दुष्काळात भारतीय शेतकऱ्याने आत्महत्या केल्या नव्हत्या पण आज शेतकरी मोठया प्रमाणात आत्महत्या करीत आहे. याचे मुख्य कारण जागतीकीकरणाने चमको विकासाला (Digital Developmnet) महत्व दिले आहे. (मोदी सरकारमधील देशाचे कृषीमंत्री या आत्महत्या रोखण्याच्या संदर्भात तर काही करीतच नाहीत उलट पक्षी या आत्महत्या प्रेम प्रकरणातून होत आहेत. असे म्हणून आपल्या बुध्दीचे ओंगळवाणे प्रदर्शन करीत आहेत.) कृषी संस्कृती, श्रम संस्कृती आणि सहजीवन संस्कृती नष्ट होवून त्या जागी भोगवादी, चंगळवादी व टगेगिरीची राजकीय संस्कृती निर्माण झाली आहे. खेड्यातील पारंपरिक पाणंद, पाऊल वाटा, वाडा, बैलबारदाणा, गाई म्हैशी, दूध दुभते, गावराण भाजीपाला हे सर्व नष्ट झाले आहे. त्याची जागा मोबाईल, टी.व्ही., फ्रिज, मिक्सर, कपाट, कॉट, मोटर सायकल, या साधनांनी घेतली आहे. यामुळे शेती पोट भरण्याचे साधन न मानता ते आपल्या आपेक्षा पुर्तीचे साधन मानले जाऊ लागले आहे. या मुळे खेड्यातला माणूस आज शिकला सावरला, तालुका जिल्हा एवढेच नाही तर राज्य देशाचे राजकारण पाहू लागला परंतु राजकारणाचा सकारात्मक अर्थ लावण्या ऐवजी तो नकारात्मक अर्थ घेऊन राजकारण करु लागला आहे. याला जागतिकीकरणातील आर्थिक प्रक्रिया कारणीभूत आहे. दुसरे काय?

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani